क्र:मपोअ/प्रशि-1/प्रशि सत्र क्र.127 /PSI/2025 /3433
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक
यांचे कार्यालय त्रंबकरोड, नाशिक - 422 007
आय.एस.ओ. 9001:2000 प्रमाणित
☎ (0253) 2352161, फॅक्स - 2352159
✉ director.mpa.nashik@mahapolice.gov.in
नाशिक, दिनांक :- 13 MAY 2025

**विषय** :- प्रशिक्षणार्थी पोलीस उप निरीक्षक सत्र क्र.127 मधील हजर होणाऱ्या उमेदवारांनी भरावयाचे नोंदणी प्रपत्र व वचनपत्र मपोअ येथील सेकंतस्थळावर प्रदर्शित करणेबाबत.

******

**आदेश:-**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेले प्रशिक्षणार्थी पोलीस उप निरीक्षक सत्र क्र.127 मधील 598 उमदेवार व मागील सत्रात मुदतवाढ दिलेले उमेदवार हे दि.09/06/2025 रोजी महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक येथे हजर होणार आहेत.

त्याअनुषंगाने सर्व उमेदवारांनी महाराष्ट्र पोलीस अकॅडमीमध्ये हजर झाल्यावर नोंदणी प्रपत्र व वचनपत्र भरणे बंधनकारक आहे. तरी प्रशिक्षणार्थी पोलीस उप निरीक्षकांचे नोंदणी प्रपत्र व वचनपत्र हे म.पो.अ. वेबसाईटवर PDF FORMAT मध्ये FLASH करावे आणि त्यासोबत खालील सुचना जोडुन सादर कराव्यात.

उमेदवारांकरीता सुचना:-

1) प्रत्येक उमदेवारांनी www.mpanashik.gov.in या संकेतस्थळावर सादर **केलेले नोंदणीप्रपत्र व वचनपत्र Dowanload करुन स्वत:च्या अक्षरात भरावे आणि महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, येथे प्रशिक्षणास हजर होताना सादर करावे**.
2) उमदेवारांनी सदरच्या नोंदीणीप्रपत्र व वचनपत्रावर कोणत्याही ठिकाणी स्वाक्षरी करु नये. प्रत्यक्ष प्रशिक्षणास हजर होताना उमदेवाराची स्वाक्षरी सक्षम प्राधिकाऱ्यासमोर घेण्याची तजवीज ठेवली आहे.
3) सोबत नमुना नोंदणीप्रपत्र / वचनपत्र माहितीकरीता जोडण्यात आलेले आहे.
4) सोबत उमेदवारांना दयावायाच्या मार्गदर्शक सुचना जोडण्यात आलेल्या आहेत.

**संचालक यांचे मान्यतेने )**

( संजय बारकुंड )
सहसंचालक,
महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक

प्रति,

उपसंचालक, आय.टी. विभाग, म.पो.अ.नाशिक

## पोलीस उपनिरीक्षक पदाच्या प्रशिक्षणास हजर राहणाऱ्या 127 बॅचच्या कॅडेट्सना मार्गदर्शक सूचना

1. पोलीस उपनिरीक्षक (मुख्य) परीक्षा 2022 मधील निवड करण्यात आलेले 598 व मागील सत्रात मुदतवाढ दिलेल्या उमेदवारांनी दिनांक 09/06/2025 रोजी सकाळी 08.00 वाजेपावेतो महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक येथे प्रशिक्षणासाठी हजर रहावे.

2. पोलीस उपनिरीक्षक पदासाठी निवड करण्यात आलेले उमेदवार विहीत वेळेत व दिनांकास महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक येथे प्रशिक्षणास हजर न झाल्यास त्यांना पोलीस उपनिरीक्षक पदासाठी हजर होण्यास स्वारस्य नाही असे समजण्यात येईल व त्यांची निवड रद्द करण्यात येईल.

3. प्रशिक्षणामध्ये बाहयवर्ग प्रशिक्षण, शारीरीक कवायत,धावणे,पी.टी.,योगा,मैदानी खेळ यांचे प्रशिक्षण नियमितपणे करावे लागणार आहे. त्याकरीता उमेदवारांचे शारीरीक स्वास्थ्य, सुदृढ असणे आवश्यक आहे. काही उमेदवारांमध्ये कॅल्शियम,विटामीन डी,बी-2,लोह, हिमोग्लोबीनची कमतरता असल्याने त्यांना दुखापत होण्याची शक्यता असते. त्यामुळे प्रशिक्षणास हजर होतांना उमेदवारांनी खालील प्रकारची वैद्यकीय चाचणी करुन त्याचा अहवाल हजर होतांना सादर करावा.

Routine Blood Test :

A) हिमोग्लोबीन (Hemoglobin) व बी-12
B) व्हिटॅमीन डी (Vitamin-D)
C) कॅल्शियम (Calcium)
D) HBAIC
E) CBC
F) B.S.L (Fasting & (P.P)
G) Thyroid

4. जे उमेदवार गंभीर आजारी अथवा अंथरुणाला खिळून व आजारपणामुळे दिनांक 09/06/2025 रोजी प्रशिक्षणास तात्पुरते हजर होणे त्यांना शक्य होत नसल्यास, आजारी असल्याबाबत संबंधीत जिल्हा शल्यचिकीत्सक यांचे प्रमाणपत्रासह अर्ज प्रशिक्षणास हजर होण्यापुर्वी किमान 3 दिवस आधी संचालक, महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक यांचेकडे पाठविणे आवश्यक असेल. अशा उमेदवारांना जास्तीत जास्त 15 दिवसांपर्यंत उशिरा हजर होण्याबाबत परवानगी देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. अशा परवानगी मिळालेल्या उमेदवारांनी सदरचा कालावधी संपताच प्रशिक्षणास हजर न झाल्यास त्याची निवड रद्द करण्यात येईल.(शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र: मलोओ 1119/115/8 दि.02/08/2019)

5. महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पीएसबी-310/प्रक्र626/पोल-5अ, दिनांक 08/10/2010 अन्वये पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झालेल्या उमेदवारांच्या प्रशिक्षणास मुदतवाढ देण्याबाबतचे धोरण आहे. त्यानुसार मुदतवाढ घेणेकरीता सादर करावयाच्या अर्जाचा नमुना सोबत जोडला आहे.

पुढील प्रशिक्षण सत्रात प्रशिक्षणास मुदतवाढ मिळविणे गरजेचे असलेल्या उमेदवारांनी सदर परिपत्रकातील अटी व नियमात बसत असल्यास त्यांचा प्रशिक्षणास मुदतवाढ मिळण्याबाबतचा विहित नमुन्यातील अर्ज संचालक म.पो.अ., नाशिक यांचेकडील प्रशिक्षण सुरु होण्यास किमान 15 दिवस आधी पाठवावा. **सहपत्र 1 प्रमाणेच्या शासन परिपत्रकातील नमूद कारणांव्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणास्तव प्रशिक्षणास मुदतवाढ देय नाही.** विहीत नमुन्यात नसलेल्या व संचालक, म.पो.अ., नाशिक यांना प्रशिक्षण सत्र सुरु होण्यापुर्वी किमान 15 दिवस अगोदर प्राप्त न होणाऱ्या मुदतवाढीच्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. तसेच पोलीस महासंचालक/शासनास व इतर ठिकाणी केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. मुदतवाढीबाबत अर्ज स्विकृत झाला किंवा नाही याबाबतची खातरजमा करण्याची जबाबदारी संबधीत उमेदवाराची राहील. पुढील प्रशिक्षण सत्रात मुदतवाढीसाठी अर्ज केला म्हणजे मूदतवाढ मिळेलच असे नाही. मुदतवाढीचे पत्र पोहोचण्यातील पोष्टाच्या व इतर प्रशासकीय दिरंगाईस महाराष्ट्र पोलीस अकॅडमी जबाबदार राहणार नाही. गृह विभागाच्या दि.8/10/2010 रोजीच्या परिपत्रकातील तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या दि.7/8/2018 रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार पोलीस उपनिरीक्षक प्रशिक्षण सत्रामधून एक वेळा मुदतवाढ देय राहील.

**6. प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण कालावधीत केवळ खालील नमूद स्पर्धात्मक परीक्षांनाच बसण्यास परवानगी देण्यात येईल :-**

- 1. अ) महाराष्ट्र लोकसेवा आयेगामार्फत (MPSC) घेण्यात येणारी राज्य नागरी सेवा परीक्षा (Civil Services Examination)
( सध्याच्या पदांपेक्षा वरीष्ठ पदांसाठीच केवळ )
ब) केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत (UPSC) घेण्यात येणारी केंद्रीय नागरी सेवा परीक्षा Civil Services Examination)
क) MPSC व UPSC इत्यादी विभागांच्या सध्याच्या पदापेक्षा वरिष्ठ पदासाठी परीक्षा

7. प्रशिक्षणास रुजु झालेनंतर उपरोक्त स्पर्धा परीक्षेला बसणाऱ्या उमेदवारांनी परीक्षा देण्यासाठी नाशिक याच परीक्षा केंद्राची निवड करावी. केवळ नाशिक या परीक्षा केंद्रावरच प्रशिक्षणादम्यान परिक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येईल, परीक्षेसाठी **नाशिक केंद्र नसल्यास** मुंबई केंद्राची निवड करावे. **याव्यातिरिक्त इतर केंद्र निवडल्यास परीक्षेस बसण्याची परवानगी दिली जाणार नाही.**

8. शासन व्यवहारात राजभाषा मराठीचा वापर करण्यातबाबतच्या शासन निर्णय महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग कडील शासन परिपत्रक क्र.मभावा-2018/प्र.क्र.47/भाषा-2, दि.07 मे, 2018 मधील तरतूदी/ सुचना सर्व प्रशिक्षणार्थी यांना लागु राहतील.

9. अकॅडमीमध्ये प्रशिक्षणार्थीनी इस्त्री, हिटर, स्टिमर, केटल, टोस्टर, आदी विदयुत उपकरणे सोबत आणू नयेत.

10. प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थी आजारी पडल्यास **वैद्यकीय कारणास्तव प्रशिक्षणासाठी अनुपस्थीतीचा कालावधी 20 दिवसापेक्षा (आंतरवर्ग अथवा बाहयवर्ग प्रशिक्षण) जास्त होत असल्यास व त्यांची** प्रकृती या कालावधीत सुधारली नाही, **तर अशा प्रशिक्षणार्थीला पुढील वर्षाच्या प्रशिक्षण सत्रामध्ये सामावुन घेण्यात येईल.** पुढील सत्रात प्रशिक्षणास हजर करुन घेतेवेळी वैद्यकीय शारिरीक पात्रता संबधितास वैद्यकीय मंडळासमोर उभे करुन तपासली जाईल आणि वैद्यकीय मंडळाने दिलेल्या प्रमाणपत्राचे आधारावर प्रशिक्षणास सामावून घ्यावे किंवा नाही, हे ठरविण्यात येईल. **पुढील बॅचमध्ये प्रशिक्षणाची मुदतवाढ/परवानगी घेणाऱ्या उमेदवाराची ते ज्या सत्रात**

प्रशिक्षण पूर्ण करतील त्या सत्रात सेवा जेष्ठता निश्चीत करण्यात येईल व मूळ सत्राची सेवाजेष्ठता मिळणार नाही.

11. ज्या उमेदवारांना एखादया आजाराबद्दल डॉक्टरांनी मेडीसिन घेण्याचे सुचीत केले असेल अशा उमेदवारांनी सदर आजाराबाबत संबंधीत डॉक्टरांचे प्रिस्क्रिप्शनसह औषधे / गोळया ई. सोबत बाळगाव्यात आणि मपोअ येथे हजर झाल्यास सदर बाबत वैद्यकीय अधिकारी, मपोअ, नाशिक यांना अवगत करावे.

12. महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक येथे हजर झाल्यानंतर संबधित उमदेवारास गृहपाल (वसतीगृह प्रभारी) हे निवासाची जागा, कॉट व मॅट्रेस उपलब्ध करून देतील. प्रशिक्षणार्थीनी अकॅडमीमध्ये हजर होतांना पुर्ण बाहयांचा पांढरा शर्ट व पांढरी पॅन्ट (White full sleeves shirt & white trousers (प्रत्येकी 2 नग) आणावेत

13. महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक येथे हजर झाल्यानंतर **उमेदवारांना अकॅडमीतील सेंट्रल स्टोअर्समधून खालील साहित्य पुरविण्यात येईल. त्यासाठीच्या वजाती संबंधितांच्या वेतनातून करण्यात येईल.**

**14. अ) साहित्य- (म.पो.अ., सेंट्रल स्टोअर्स येथून प्रशिक्षणार्थी यांना पुरविण्यात येणारे साहित्य)**

| अ.क्र. | वस्तूचे नांव | संख्या |
|---|---|---|
| 1. | म.पो.अ.कॅप बॅच | 2 नग |
| 2. | म.पो.अ.शोल्डर बॅच | 2 नग |
| 3. | म.पो.अ.बक्कल प्लेट | 1 नग |
| 4. | लाईनयार्ड | 2 नग |
| 5. | व्हीसल (प्लॅस्टीकची) | 2 नग |
| 6. | वेब सिलींग ( नायलॉन ) | 1 नग |
| 7. | वेब ॲक्लेट | 1 जोड |
| 8. | वेब बेल्ट ( नायलॉन ) | 1 नग |
| 9. | लेदर क्रॉस बेल्ट | 1 नग |
| 10. | लेदर बेल्ट | 1 नग |
| 11. | लेदर होलस्टर | 1 नग |
| 12. | लेदर फ्रॉग | 1 नग |
| 13. | लेदर नॉट | 1 नग |
| 14. | लेदर ॲकल शूज | 1 जोड |
| 15. | लेदर ऑक्सफर्ड शुज | प्रत्येकी 1 जोडी |
| 16. | खाकी कॉटन सॉक्स | 4 जोडी |
| 17. | काळे कॉटन सॉक्स | 6 जोडी |
| 18. | सफेद कॉटन सॉक्स | 6 जोडी |
| 19. | खाकी वुलन सॉक्स | 4 जोडी |
| 20. | म.पो.केन | 1 नग |
| 21. | म.पो.क्रेस्ट (ब्लेझरसाठी) | 1 नग |
| 22. | चेस नंबर (ॲकरेलिक) | 1 नग |
| 23. | टाय पीन | 1 नग |
| 24. | म.पो.टाय | 1 नग |

| | | |
|---|---|---|
| 25. | बेरी कॅप (विगंज) | 2 नग |
| 26. | ट्रेनि टी शर्ट | 6 नग |
| 27. | ट्रेनि हाफ पॅन्ट | 6 नग |
| 28. | ट्रेनि ट्रॅक पॅन्ट (महिलांसाठी) | 6 नग |
| 29. | लाठी (फायबर) | 1 नग |
| 30. | ग्राऊड शिट | 1 नग |
| 31. | उलन जर्सी | 1 नग |
| 32. | पांढरे स्पोर्ट शुज | 1 जोड |
| 33. | प्लास्टीक बादली (15 लिटर) | 1 नग |
| 34. | प्लास्टीक मग | 1 नग |
| 35. | चावी किचन | 1 नग |
| 36. | मच्छरदानी | 1 नग |
| 37. | स्विमींग ट्रॅक (पुरुषांसाठी) | 1 नग |
| 38. | स्विमींग गॉगल | 1 नग |
| 39. | स्विमींग कॅप | 1 नग |
| 40. | स्विमींग कॉस्टयुम (महिलांसाठी) | 1 नग |
| 41. | म.पो.अ.प्रिंटेड बॅग | 2 नग |
| 42. | रजिष्टर | 12 नग |
| 43. | इनडोअर क्लास बॅग (लॅपटॉप बॅग) | 1 नग |
| 44. | पॉलीश ब्रश | 2 नग |
| 45. | पॉलीश डबी | 2 नग |
| 46. | रेन कोट | 1 नग |
| 47. | स्टील कप | 1 नग |
| 48. | नेम प्लेट | 2 नग |
| 49. | शोल्डर रिबन | 2 जोड |
| 50. | शोल्डरबॅच (मपो कापडी) | 5 नग |
| 51. | खाकी ड्रेस | 5 नग |
| 52. | कमांडो ड्रेस कॅप सह | 1 नग |
| 53. | जंगल शुज | 1 जोड |
| 54. | ब्ल्यु ब्लेझर ( रेमंड कापड) | 1 नग |
| 55. | सोअर्ड (तलवार) | 1 नग |
| 56. | खाकी पी कॅप | 1 नग |
| 57. | लॉक | 1 नग |
| 58. | बेडशीट (White) | 02 नग |
| 59. | उशी कव्हर | 02 नग |
| 60. | नायलॉन वेब बेल ग्रीन | 01 नग |
| 61. | पाणी बॉटल | 01 नग |
| 62. | सोड कव्हर | 01 नग |

| | | |
|---|---|---|
| 63. | स्काप | 01 नग |
| 64. | कबर बंद सेट | 01 नग |
| 65. | पांढरे हॅन्डग्लोज | 01 नग |
| 66. | हेअर नेट (महीलांसाठी) | 02 नग |
| 67. | हेअर बेल्ट (महीलांसाठी) | 02 नग |
| 68. | काळा कट शुज | 01 नग |

**ब) प्रशिक्षणार्थींनी सोबत आणावयाचे इतर आवश्यक साहित्य :-**

**1) चांगल्या प्रतीचा लॅपटॉप 1 नग तसेच स्वत:चा Email - ID तयार करून घेवून यावा.**

**क) रुम मध्ये उपयोगी येणारे साहित्य.**

| | |
|---|---|
| 1) ब्लँकेट | 1 नग |
| 2) चादर (सोलापुरी) | 1 नग |
| 3) सफेद शर्ट (Full sleeves) | 2 नग |
| 4) सफेद ट्राउझर | 2 नग |
| 5) सिव्हील ड्रेस | आवश्यकते प्रमाणे |

15. **वर नमूद साहित्याव्यतिरिक्त प्रशिक्षणासाठी व अभ्यासासाठी आवश्यक ते साहित्य अकॅडमीतील सेंट्रल स्टोअर्समधून प्रशिक्षणार्थींना पुरविण्यात येईल व त्यासाठीच्या वजाती संबंधीतांच्या वेतनातून करण्यात येईल. सेंट्रल स्टोअर्स येथे उपलब्ध असणारे साहित्य प्रशिक्षणार्थींनी सोबत आणू नये.**
16. **सेंट्रल स्टोअर व सबसिडिअरी कॅन्टीन येथील सर्व व्यवहार हे एटीएम /डेबीटकार्ड / क्रेडीट कार्ड /UPI माध्यमातून करण्यात येईल.**
17. महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक येथील मेसमध्ये प्रशिक्षणार्थीना जेवणाची व्यवस्था आहे. प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण कालावधीत वेतन व भत्ते मिळणार आहेत. **त्यांचा मेसमध्ये होणारा खर्च त्यांच्या वेतनातून वजाती करण्यात येईल.**
18. प्रशिक्षणार्थीना महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक येथे हजर झाल्यानंतर प्रशिक्षणादरम्यान नियमानुसार दरवर्षी रूपये 6000/- गणवेश अनुदान मंजूर करण्यात येईल.
19. प्रशिक्षणार्थीने अकॅडमीमध्ये ठरवून दिलेल्या नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. सदरचे नियम त्यांना अकादमीमध्ये हजर झाल्यानंतर समजावून सांगण्यात येतील.
20. अकॅडमीचे खाते **MPA NEW TRAINEES** या नावाने SBI शाखा महात्मानगर येथे असून खाते क्रमांक **42069588749** असा असून SBI बॅकेच्या महात्मानगर **ब्रँचचा IFSC Code हा SBIN0021197** असा आहे. सदर खात्यावर प्रशिक्षणार्थीनी NEFT च्या माध्यमातून रुपये 15000/- ही रक्कम जमा करावी व त्याबाबतची Slip ची कॉपी (Printout) अॅकॅडमीत येतांना सोबत आणावी. तसेच Transaction ID स्वतंत्र नोंदवुन हजर होतांना आवश्यकतेनुसार सादर करावा. सदरची रक्कम ही रोख स्वरुपात स्विकारली जाणार नाही. तरी संबंधीत उमदेवारांनी सदरची रक्कम online पध्दतीने भरणा करावी.
21. **सर्व प्रशिक्षणार्थी यांनी White & White ड्रेसवर** red background असलेल्या **व दोन्ही कान पूर्ण दिसतील असे चेहरा समोर ठेवून फोटो काढावेत व 10 फोटो (PassPort) कॉपीज सोबत आणावेत. ज्या प्रशिक्षणार्थींना चष्मा असल्यास गॉगल ग्लासचा चष्मा न वापरता प्लेन चष्मा वापरुन फोटो काढावेत.**
22. प्रशिक्षणार्थीनी प्रशिक्षण कालावधीत मौल्यवान/ किमती वस्तू (दागदागीने, महागडे गॉगल्स, महागडे घडयाळ, इ.) रोख रककम स्वत: **सोबत बाळगू नयेत.**

23. प्रशिक्षण काळामध्ये प्रशिक्षणार्थींनी **शक्यतो** स्वत:चे विवाह आयोजित करु नये. प्रशिक्षणा संपल्यावर विवाह कार्यक्रम ठेवावे.

24. **अॅकॅडमीतील Leave policy नुसार केवळ आई-वडील/पत्नी-पती/ मुलगा-मुलगी (First blood relationship) यांचे मृत्यु/गंभीर आजारपणासाठीच रज़ा देणेबाबत विचार करण्यात येईल.** आजी-आजोबा, काका-काकू, मामा-मामी, आत्या-मावशी यासारखे इतर नातेवाईकांचे आजारपण, मृत्यू व लग्नसोहळयांकरीता रजा देण्यात येणार नाही. **तसेच खेळाडू उमेदवारांना संपूर्ण प्रशिक्षण कालावधीत 10 दिवसापेक्षा जास्त खेळाकरीता बाहेर जाण्याची परवानगी देण्यात येणार नाही.**

25. **उमेदवारांनी प्रशिक्षणादरम्यान मोबाईल फोनचा वापर हा फक्त वस्तीगृहाचे आवारात करावा.**

26. " प्रशिक्षण कालावधीत अथवा प्रशिक्षण संपल्यानंतर पुढील तीन वर्षात पोलीस उपनिरीक्षक या पदावरील नोकरीचा राजीनामा दिल्यास/सदर पदावरुन कार्यमुक्त करण्यास विनंती केल्यास अशा उमेदवाराकडून प्रशिक्षणावर झालेला खर्च आणि प्रशिक्षण कालावधीत अदा केलेल्या वेतन व भत्यासहीत संबंधीत उमेदवाराकडून वसूल करण्यात येईल ही अट मी जाणून आहे व सदर अट मला मान्य व बांधील आहे " अशा आशयाचे बंधपत्र रु.100/- चे बॉंड पेपरवर लिहून देणे आवश्यक आहे. सदर बंधपत्राचा नमुना (सहपत्रे-3) प्रमाणे नुसार सोबत जोडला आहे. प्रशिक्षणास हजर होणाऱ्या सर्व प्रशि. पोलीस उपनिरीक्षकांनी सदर बंधपत्र रु.100/- चा बॉंडवर लिहून **(सक्षम अधिका-यासमोर नोंदविलेले शपथपत्र (affidavit) )** प्रशिक्षणास हजर होतांना कागदपत्रांच्या तपासणीच्या वेळेस संबंधीत तपासणीसाकडे सादर करावे. बंधपत्रावर दोन जामीनदारांच्या स्वाक्षऱ्या आवश्यक आहेत. (शासन पत्र क्र. पीएसबी-0311/प्र.क्र.464/पोल-5अ दि.04/11/2011)

27. प्रशिणास हजर होतांना प्रशिक्षणार्थी यांनी या सोबत जोडलेल्या सहपत्र व बंधपत्र 1 ते 10 नमुद सहपत्र भरुन देणे आवश्यक राहील.

28. सदर मार्गदर्शक सूचना व मार्गदर्शक सूचनांसोबतची सहपत्रे **www.mahapolice.gov.in** व **www.mpanashik.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

( टिप:- या फक्त प्रशिक्षणास हजर होतांना प्रशिक्षणार्थीकरीता मार्गदर्शक सुचना असुन सेवा शर्ती व इतर प्रशासकीय बाबी नियुक्ती आदेशाप्रमाणे असतील.

सहपत्रे:-

1.पोउपनि पदाच्या पुढील प्रशिक्षण सत्रात प्रशिक्षण घेण्यास परवानगीचा अर्ज

2.प्रशि.पोउपनि यांचे नोंदणी प्रपत्र व वचनपत्र

3.शपथपत्राचा नमुना

4.बंधपत्र 1 ते 10

**( राजेश कुमार )**
संचालक
महाराष्ट्र पोलीस अॅकॅडमी, नाशिक

**पोलीस उप निरीक्षक पदी निवड झालेल्या**
**उमेदवारांच्या प्रशिक्षणास मुदतवाढ देण्याबाबत...**

महाराष्ट्र शासन,
गृह विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : पीएसबी-०३१०/प्र.क्र.६२६/पोल-५अ,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ८ ऑक्टोबर २०१०

**: शासन परिपत्रक :**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पोलीस उपनिरीक्षक (महिला व पुरुष बिनहत्यारी) यांचे ५०% पदे सरळसेवा (नामनिर्देशनाने) भरतीने भरण्यात येत असून, या पदी नियुक्तीसाठी शिफारस झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक येथे १२ महिन्यांच्या प्रशिक्षणासाठी पाठविण्यात येते. काही उमेदवार विविध कारणांमुळे प्रशिक्षणासाठी मुदतवाढ देण्याबाबत शासन, पोलीस महासंचालक यांच्याकडे विनंती अर्ज पाठवित असतात. प्रशिक्षणास मुदतवाढ देण्यासाठी प्राप्त अर्जांवर निर्णय घेण्यासाठी कोणतीही मार्गदर्शक तत्त्वे नसल्याने अशा अर्जांवर निर्णय घेताना अडचणी निर्माण होतात. हे लक्षात घेऊन प्रशिक्षणास मुदतवाढ देण्याबाबत मार्गदर्शक तत्त्वे ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. विविध यंत्रणांकडे पाठविण्यात आलेल्या मुदतवाढीच्या विनंती अर्जांवर एकत्रित कार्यवाही करण्याच्या दृष्टीने एकसुत्रता असावी म्हणून खालीप्रमाणे मार्गदर्शक तत्त्वे ठरविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

(अ) पोलीस उपनिरीक्षक मुख्य परीक्षा २००७ मध्ये निवड झालेल्या व त्यापुढे पोलीस उपनिरीक्षक (पुरुष व महिला) मुख्य परीक्षेतून निवड होणाऱ्या उमेदवारांना प्रशिक्षणास पाठविण्याच्या आदेशात असे स्पष्ट नमूद करण्यात यावे की, उमेदवारांना प्रशिक्षणाच्या मुदतवाढी संदर्भात विनंती अर्ज करावयाचे झाल्यास ते केवळ संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांच्याकडेच पाठविण्यात यावेत. शासनाकडे अथवा पोलीस महासंचालकांकडे प्राप्त झालेले मुदतवाढीचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

(ब) उमेदवारांच्या प्रशिक्षणासाठीच्या आदेशात असेही नमूद करण्यात यावे की, केवळ खालील तीन कारणांमुळे प्रशिक्षणास मुदतवाढ देण्याबाबत विचार करण्यात येईल. इतर कारणांसाठी मुदतवाढ दिली जाणार नाही.

(१) स्त्री उमेदवारांच्या बाबतीत त्या गरोदर असल्यास व तसे वैद्यकिय प्रमाणपत्र त्यांनी सादर केल्यास मुदतवाढीबाबत विचार करण्यात येईल.

(२) उमेदवार स्वतः आजारी असल्याबाबत व त्यास किमान एक महिना रुग्णालयात आंतररुग्ण म्हणून रहावे लागत असल्याचे "जिल्हा शल्य चिकित्सक" यांनी प्रमाणित केलेल्या प्रमाणपत्रासह उमेदवारांनी अर्ज केल्यास मुदतवाढीबाबत विचार करण्यात येईल.

(३) उमेदवार महाराष्ट्र लोकसेवा आयोग किंवा केंद्रीय लोकसेवा आयोगाची पूर्व परीक्षा उत्तीर्ण झाला असेल तर तशा आशयाच्या पुराव्यासह प्रशिक्षणास मुदतवाढीसाठी अर्ज केल्यास, मुदतवाढ देण्याबाबत विचार करण्यात येईल.

२. वरील कारणास्तव प्रशिक्षणासाठी मुदतवाढ देण्याबाबतचे निर्णय संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांच्या स्तरावर घेण्यात येतील व सदर निर्णय अंतिम राहिल. प्रशिक्षण मुदतवाढीच्या अर्जावरील निर्णय, असा अर्ज प्राप्त झाल्यापासून दहा दिवसाच्या आत संबंधित उमेदवारांस संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक कळवतील.

३. वरील तीन कारणांव्यतिरिक्त अन्य कोणत्याही कारणास्तव आलेल्या विनंत्या नाकारल्यास, त्याबाबत पोलीस महासंचालक, शासन अथवा मंत्री महोदयांकडे केलेले अपील विचारात घेण्यात येणार नाही.

४ सदर परिपत्रक पोलीस महासंचालक यांचे कार्यालयाच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांच्या निदर्शनास आणण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नावाने व आदेशानुसार

( सदानंद जाधव )
**शासनाचे उपसचिव, गृह विभाग.**

प्रत.

(१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
(२) अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
(३) संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
(४) सर्व विभागीय पोलीस आयुक्त.
(५) सर्व पोलीस अधिक्षक.
(६) समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, मुंबई.
(७) आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, मुंबई.
(८) निवड नस्ती / पोल-५अ

सहपत्र -2

**पोलीस उपनिरीक्षक पदाच्या पुढील प्रशिक्षण सत्रात प्रशिक्षण घेण्यास परवानगी मिळणेबाबतच्या अर्जाचा नमूना**

अर्जदाराचे नाव
पत्रव्यवहाराचा पत्ता
मोबाईल नंबर-
E mail id-
दिनांक

प्रति,

मा.संचालक,
महाराष्ट्र पोलीस अकॅडमी,
त्र्यंबकरोड, नाशिक
विषय - पोलीस उपनिरीक्षक पदाच्या पुढील प्रशिक्षण सत्रात प्रशिक्षण घेण्यास परवानगी मिळणेबाबत ...

***

महोदय,

माझी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या सरळसेवा पोलीस उप निरीक्षक (मुख्य) परीक्षा- 2022 मधील उमेदवारांच्या (पुरुष व महिला) (बिनहत्यारी) मुख्य परीक्षा पोलीस उपनिरीक्षक पदासाठी निवड झालेली असुन, सदर पदाच्या मुलभुत प्रशिक्षणासाठी मला दिनांक 09/06/2025 रोजी महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक येथे हजर राहण्याबाबत समज देण्यात आली आहे.

**मी खालील कारणास्तव पुढील सत्र प्रशिक्षणाची परवानगी मिळणेस विनंती आहे**.

(योग्य कारणावर अशी खुण करा. संबंधित रिकाम्या जागा भरा व नको ते खोडा.)

1. ☐ मी सध्या गरोदर असुन माझ्या प्रसुतीचा संभाव्य दिनांक / / हा आहे. प्रसुतीचा संभाव्य दिनांक दर्शविणारे जिल्हा शल्यचिकित्सक, यांचे प्रमाणपत्र सोबत सादर केले आहे.

2. ☐ अ) मी ____________ कारणास्तव दिनांक / / पासुन / / पर्यंत या रुग्णालयात आंतररुग्ण म्हणून दाखल आहे

☐ ब) यानंतरही मला दिनांक / / ------ दिवस **पावेतो रुग्णालयात आंतररुग्ण म्हणून** दाखल राहावे लागणार असल्याबाबत वैद्यकिय अधिकाऱ्यांनी सुचित केले आहे. वरील मुद्यांबाबत जिल्हा शल्यचिकित्सक, (जिल्हा) यांचे **वैद्यकिय प्रमाणपत्र सोबत सादर केले आहे**.

3. ☐ मी MPSC/UPSC द्वारा संयोजित या पदाच्या स्पर्धा परिक्षेस बसलो/बसले असुन मुख्य परीक्षेस पात्र आहे. त्यामुळे मला मुख्य परीक्षेची पुर्वतयारी करणे आवश्यक आहे. स्पर्धा परीक्षेसाठी सादर केलेल्या अर्जाची प्रत, मुख्य परीक्षेस पात्र ठरल्याच्या पत्राची प्रत/परीक्षेचे हॉल टिकीट यांच्या साक्षांकित छायांकित प्रती सोबत सादर केल्या आहेत.

2. यापूर्वी Extension घेतले असल्यास Extension मंजुरीचा आदेश क्रमांक व दिनांक नमूद करावा.

-----------------------------------------------------------------------------------------------

तरी मला या प्रशिक्षण सत्राच्या **लगतनंतरच्या प्रशिक्षण सत्रात** प्रशिक्षण घेण्यास कृपया परवानगी देण्यात यावी, ही विनंती.

आपला/आपली विश्वासू

उमेदवाराचे नाव व स्वाक्षरी

# Bond on Stamp Paper of Rs.100/-

To be executed by Cadet Police Sub Inspector on reporting for training at Maharashtra Police Academy, Nasik.

****

This bond is executed on day of 2024 by

(Name) Date of Birth / /

Having permanent address at (Village/Town) (Taluka) (District) in

favor of Home Department, Government of Maharashtra represented severally by the Joint Director, Maharashtra Police Academy, Nashik (appointing authority) and Inspector General of Police, Establishment P.H.Q. Mumbai (Cadre controlling authority) son/daughter/wife of--------------------------------- hereby furnish an irrevocable bond in favor of Home Department, Government of Maharashtra and bind myself irrevocably as under :-

1) That, I have joined as a Police Sub Inspector (hereafter referred as PSI) in Police Department with effect from / /2024 as a sequel to my selection to the said post, through M.P.S.C. examination.

2) that, I agree that, during the training period of 2 years, and thereafter, during the subsequent period of 3 years after completion of training period, if I resign from the post of PSI or apply to the government to relieve me from the service on any grounds other than those deemed fit or acceptable by the Government, I shall be liable to reimburse all Expenses incurred on my training, plus the salary and allowances paid to me during my service period.

I have executed this bond after having understood the meaning of the contents thereof and I solemnly state that I shall abide by the said bond executed by me.

(Name **and signature of the Candidate)**

**Signature and Name of guarantor-1**

In case the bondee fails to honor the Commitment, I shall reimburse the Amount payable to the Government on Behalf of Shri.______________________

Name: - ___________________________

Complete address:-__________________

_______________________

PAN NO.___________________

(Signature)_________________

**Signature and Name of guarantor-2**

In case the bondee fails to honor the commitment, I shall reimburse the amount payable to the Government on behalf of Shri.______________

Name :-______________

Complete address:-_____________

_______________________

PAN NO.________________

(Signature)_______________

सहपत्र-4

फोटो

(येथे चि  टवा)

( याव्यतिरिक्त 2 अतिरिक्त फोटों सादर  रावेत.)

Office set-page **1**

प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षक **सत्र क्रमांक 127 (DN)**

## प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षकांचे नोंदणी प्रपत्र व वचनपत्र

प्रशिक्षणार्थीा **M** **F**

| | | |
|---|---|---|
| १ | प्रशिक्षणार्थींचे नाव | (आडनाव) (स्वत:चे नाव) (वडील/पतीचे नाव) |
| २ | दूरध्वनी क्रमांक-<br>(एस.टी.डी. कोडसह) | घरचा -<br>e-mail id- |
| ३ | आपत्कालीन परिस्थितीत संपर्कासाठी नाव व दुरध्वनी क्रमांक (एस.टी.डी. कोडसह) | नाव-<br>पत्ता-<br>त्यांचेशी असलेले नाते-<br>फोन क्रमांक (Land Line)-<br>मोबाईल क्रमांक - |
| ४ | अ) सध्याचे राहण्याचे ठिकाण व<br>ब) कायमचा राहण्याचा पत्ता | |
| ५ | वडीलांचे नाव व राहण्याचे ठिकाण | |

| | | |
|---|---|---|
| ६ | [redacted] अ) अंकी (उदा. 07.05.1980) | |
| | ब)अक्षरी (उदा.सात मे एकोणीसशे ऐंशी) | |
| ७ | अ) धर्म | |
| | ब) जात | |
| | क) प्रवर्ग | |
| | ड) निवड प्रवर्ग | |
| ८ | [redacted] जातीची वैधता झाली आहे काय? असल्यास वैधता प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक [redacted] | |
| ९ | उंची (सेंटीमिटरमध्ये) | |
| १० | [redacted] | |

| अ.क्र. | शिक्षण | वर्ष | विद्यापीठ |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |

| | | |
|---|---|---|
| ११ | रक्तगट | |
| १२ | ओळखण्यासाठी अंगावरील खुणा | १) |
| | | २) |
| १३ | आधार कार्ड क्रमांक | |
| १४ | विवाहीत आहात अगर कसे? | होय नाही विभक्त |
| १५ | लॅपटॉप सोबत आणला आहे काय? | होय नाही |

| | | |
|---|---|---|
| १६ | यापूर्वीशासनाच्या सेवेत होता काय ? असल्यास | केंद्र ☐ राज्य ☐ |
| | अ) विभाग (उदा. गृह विभाग, महसूल विभाग) | |
| | ब) कार्यालयाचे नाव व पत्ता | |
| | क) पदनाम | |
| | ड) नियुक्तीचा दिनांक | |
| | इ)) पूर्वीच्या सेवेतुन कार्यमुक्त झाल्याचा/ पूर्वीच्या विभागाने राजीनामा स्विकारल्याचा<br>दिनांक [redacted] | |
| १७ | प्रशिक्षणास हजर होतांना स्पर्धा परीक्षेचे फॉर्म भरले<br>असल्यास त्याची माहिती<br>**परिक्षेचे नाव**<br>**परिक्षेची तारीख** | |
| | कार्यालयीन कामकाजाकरीता | |
| १८ | वैद्यकिय तपासणी **पात्र** **अपात्र** | |
| १९ | चारित्र्य पडताळणी समाधानकारक **इतर** | |
| २० | उमेदवाराचाा जात **प्रवर्ग** निवड **प्रवर्ग** | |
| २१ | [redacted] **वैधताा प्रमाणपत्र लागू नाही.** जात **वैधता झाली आहे.** जात **वैधता झालेली नाही**<br>जाता वैधता झालेली नाही. निवड खुल्या प्रवर्गातून असल्याने आवश्यकता नाही. | |
| २२ | **महिला उमेदवारांच्या बाबतीत प्रगत उन्नत गटात मोडत नसल्याबाबत संचालक, महिला व बाल कल्याण, पुणे यांचे प्रमाणपत्र.**<br>I)) आहे.<br>II)) उमेदवाराचा जात प्रवर्ग ST/SC/DT(A)/NT(B) असल्याने आवश्यकता नाही. | |

| | |
|---|---|
| | III)) उमेदवार मागासवर्गीय जात प्रवर्गातील असून निवड खुल्या प्रवर्गातून झाली आहे. उमेदवाराने **जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्याने** संचालक, महिला व बाल कल्याण, पुणे यांचेकडील प्रगत उन्नत गटात मोडत नसल्याबाबतच्या प्रमाणपत्राची आवश्यकता नाही.<br><br>IV)) उमेदवाराची निवड ३० % महिला आरक्षणातून झाली आहे. तथापी संचालक, महिला व बाल कल्याण, पुणे यांचेकडून प्रगत उन्नत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त नसल्याने उमेदवाराने सदर **प्रमाणपत्र प्राप्त होण्याच्या अधिनतेने तात्पुरत्या स्वरुपात प्रशिक्षणास हजर करुन घेण्याबाबत विनंती केली आहे.** (सोबत अर्ज जोडला आहे.) |
| २३ | प्रशिक्षणासा हजर करुन घेतल्याचा दिनांक / / २०२५ वेळ- |
| २४ | उमेदवाराच्याा ओळखीची खात्री केली. |

स्वाक्षरी

महाराष्ट्र पोलीस अकॅडमी,
नाशिक यांचे करीता

उमेदवाराची स्वाक्षरी

# Undertaking I

मी                                                                                  प्रशि. पोलीस उपनिरीक्षक याद्वारे असे नमुद करतो की, महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक येथील प्रशिक्षणात पी.टी., ड्रील, ऑबस्टॅकल, शस्त्र हाताळणी व गोळीबार सराव, स्फोटकांची हाताळणी, जमाव हाताळणी, विविध खेळ इत्यादी बाबी अंतर्भुत आहेत, हे मला ज्ञात आहे. सदर प्रशिक्षणामधील काही बाबी धोकेदायक आहेत, याची मला जाणीव आहे. सदर प्रशिक्षणादरम्यान मला काही इजा/अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी माझी राहील. यासाठी अकॅडमी अथवा अकॅडमीतील कोणीही प्रशिक्षक कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत. मी असेही जाहिर करतो की, मला कोणताही मोठा आजार अथवा मेडिकल डिसॅबिलीटी नाही व सदरचे प्रशिक्षणासाठी ती स्वेच्छेने हजर झालो असुन मी ते पूर्ण करण्यास सक्षम आहे.

**स्थळ - म.पो.अ., नाशिक**

**स्वाक्षरी-**

**नाव- ( )**

**समक्ष**

**महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक**

**सहायक संचालक**
**संचालक, महाराष्ट्र पोलीस अकॅडमी,**
**नाशिक यांचे करिता**

## Undertaking II

मी ______________________________ प्रशि. पोलीस उपनिरीक्षक, महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक खालील नमुद केल्याप्रमाणे लिहुन देतो की,

1. मला महाराष्ट्रातील कोणत्याही ठिकाणी नोकरी करावी लागेल व कोणत्याही एका ठराविक जिल्हयात/परिक्षेत्रात माझे घरघुती कारणास्तव नियुक्त करण्याबाबत मी विनंती अगर कोणत्याही प्रकारे प्रयत्न करणार नाही.
2. मी अकॅडमीमधील शिस्त व नियमांचे कोटेकोर पणे पालन करेल त्यांचे उल्लंघन केल्यास मी शिस्तभंग कार्यवाहीस पात्र राहील याची मला जाणीव आहे व मला मान्य आहे.
3. मला अकॅडमीत होणाऱ्या अंतर्गत व अंतीम परीक्षेत उत्तीर्ण व्हावे लागेल, याची मला जाणीव आहे.
4. प्रशिक्षण कालावधीत मद्यपान, धुम्रपान किंवा इतर अंमली पदार्थाचे सेवन केल्यास कायदेशीर शिस्तभंग कारवाईस मी पात्र राहीन, यांची मला जाणीव आहे.
5. प्रशिक्षण कालावधीत अकादमी परिसरात कुठलेही गैरकृत्य केल्यास त्याबाबत कायदेशीर शिस्तभंग कारवाईस मी पात्र राहीन, यांची मला जाणीव आहे.
6. वरील बाबींचे उल्लंघन झाल्यास माझेविरुध्द शिस्तभंगाचे कार्यवाहीस ज्यामध्ये सेवेतून कमी करण्याचादेखील समावेश आहे, यास मी पात्र राहील व हे मला मान्य आहे.
7. महिला प्रशिक्षणार्थी अधिकारी तसेच इतर महिलांविषयी मी आदराची व सन्मानाची वागणूक ठेवीन. महिलां संदर्भात कोणत्याही प्रकारची आगळीक, गैरवर्तन व गुन्हेविषयक कृत्य माझ्याकडून घडल्यास मी कायदेशीर कारवाईस पात्र राहीन. याची मला जाणीव आहे व मला मान्य आहे.
8. महिला प्रशिक्षणार्थी पोलीस उप निरीक्षक हे पुरुष प्रशिक्षणार्थी वसतिगृह परिसरात तसेच पुरुष प्रशिक्षणार्थी पोलीस उप निरीक्षक हे महिला प्रशिक्षणार्थी वसतिगृह परिसरात प्रवेश करणार नाहीत.

समक्ष

सहायक संचालक<br>
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकॅडमी,<br>
नाशिक यांचे करिता

प्रशिक्षणार्थी पोउपनि यांची स्वाक्षरी

## Undertaking - III

I ______________________________ understand that my date of birth recorded in my Service Sheet is / / and that no application for alteration of the entry regarding date of birth will be entertained after period of 5 (Five) years from the date of my entry in Government Service.

Place- M.P.A.Nashik

Date - Signature

## Undertaking - IV

I understand that my employment under Government is temporary that my services may be dispensed with at any time without notice and without any reason being assigned and I accept the employment on this basis. (Govt. letter, Political & services dept. No. 1581/34 dated 9/8/1947)

Place- M.P.A.Nashik

Date -

Signature

समक्ष

सहायक संचालक
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकॅडमी,
नाशिक यांचे करिता

प्रशिक्षणार्थी पोउपनि यांची स्वाक्षरी

## Undertaking -V

## Form regarding declaration of " HOME TOWN "

1. Name and Grade of the Govt. servant
2. Whether the permanent home town as entered in your service book is to be

   taken as Home Town.

IF not please State,

1. Name of the Place as home Place Taluka

2. District

(Signature of Govt. Servant)
Designation

## Undertaking VI

मी ______________________________ शपथ घेतो की, मी भारताशी व कायद्याने प्रस्थापित झालेल्या भारतीय राज्यघटनेशी इमानी व खराखुरा एकनिष्ठ राहीन आणि मी माझे हुद्याची कामे निष्ठापुर्वक, प्रमाणिकपणे आणि नि:पक्षपातीपणाने पार पाडीन.

म.पो.अ. नाशिक

दिनांक स्वाक्षरी

समक्ष

सहायक संचालक
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकॅडमी,
नाशिक यांचे करिता

प्रशिक्षणार्थी पोउपनि यांची

# Undertaking VII

मी , दिनांक / /2025 रोजी महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक येथे पोलीस उपनिरीक्षक पदाच्या मुलभूत प्रशिक्षणासाठी हजर झालो/झाले आहे. अकॅडमीतील पोलीस उपनिरीक्षक पदाचे प्रशिक्षण भावी सेवाकाळासाठी महत्वाचे असून, मी प्रशिक्षण कालावधीत केवळ प्रशिक्षणावर लक्ष केंद्रीत करणे आवश्यक आहे याची मला प्रशिक्षणास हजर होतांनाच जाणीव करुन देण्यात आली आहे. त्यामुळे मी प्रशिक्षण कालावधीत फक्त महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (MPSC) घेण्यात येणारी सदर पदापेक्षा वरिष्ठ पदांसाठी व केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत (UPSC) घेण्यात येणारी नागरी सेवा परीक्षा (Civil Service Examination) भारतीय वन सेवा फक्त या परीक्षा वगळता इतर कोणत्याही परीक्षेस बसणार नाही अथवा इतर कोणत्याही परीक्षेला बसण्यासाठी परवानगी किंवा रजा मागणार नाही.

2. महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग कडील शासन परिपत्रक क्र.मभावा-2018/प्र.क्र.47/भाषा-2, दि.07 मे, 2018 अन्वये प्रशिक्षण काळातील प्रश्नपत्रिका इंग्रजी माध्यमातून न करता 100% मराठी भाषेचा वापर करण्यात यावा. त्या अनुषंगाने सत्र दरम्यान होणाऱ्या परीक्षा करीता कोणत्याही प्रशिक्षणार्थीस इंग्रजी माध्यमातून परीक्षा देण्याची परवानगी देण्यात येणार नाही याची सर्व उमेदवारांनी नोंद घेण्यात यावी.

3. प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षणार्थींना रजा मिळत नसल्याने प्रशिक्षण काळामध्ये स्वत:चे विवाह कार्य करावयाचे शक्यतो टाळणे ही बाब मला मान्य आहे. तसेच धार्मिक अथवा इतर कारणासाठी विवाह करणे अत्यावश्यक असल्यास व नाशिक येथेच करावयाचा असल्यास फक्त रविवारी सुटी मिळू शकेल ही बाब मला माहित आहे.

4. अकॅडमीतील Leave Policy नुसार केवळ आई/वडील/पती/पत्नी तसेच स्वत:चा मुलगा/मुलगी यांचे गंभीर आजारपणाचे /मृत्युचे प्रकरणी जास्तीत जास्त 3 दिवस सुट्टी एकदा मिळू शकेल. अन्य कोणत्याही नातेवाईकांकरीता अशी सुट्टी मिळणार नाही याची मला जाणीव आहे व अशा अन्य प्रकरणात मी सुटी मागणार नाही.

5. प्रशिक्षणादरम्यान MPSC व UPSC या परीक्षा वगळता अन्य कुठल्याही स्पर्धा परीक्षेकरीता रजा मिळणार नाही. तसेच उपरोक्त परीक्षा केवळ रविवारी असल्याने त्याकरीता शनिवारी दुपारनंतर परवानगी व रविवारी सवलत मिळेल याची मला जाणीव आहे. परीक्षेसाठी केवळ नाशिक केंद्रच निवड करण्यात येईल नाशिक केंद्र नसल्यासच मुंबई केंद्र निवड करावे लागेल, ही बाब मला मान्य आहे. याव्यतिरीक्त केंद्राची निवड केल्यास मला परिक्षेस जाण्याची परवानगी तसेच रजा मिळणार याची मला जाणीव आहे.

समक्ष

( ) सही ( )

संचालक
महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक
यांचे करिता

प्रशि. पोलीस उपनिरीक्षक सत्र क्र.124

## Undertaking VIII

**( फक्त खुल्या प्रवर्गातील 30% आरक्षणाचा लाभ घेतलेल्या महिलांकरीता)**

दिनांक / /2025

प्रति

मा. संचालक,
महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक
विषय - संचालक, महिला व बाल कल्याण, पुणे यांचेकडील प्रगत उन्नत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र एक महिन्याचे आंत सादर करण्याबाबत..

अर्जदार - ----------------------------------------------------------------

..00..

मा. महोदय,

माझी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या पोलीस उपनिरीक्षक (मुख्य) परीक्षा 2021 मधून महिलांसाठी राखीव असलेल्या प्रवर्गातून पोलीस उपनिरीक्षक पदासाठी निवड झाली असल्याने मला नियुक्तीपूर्वी संचालक, महिला व बाल कल्याण, पुणे यांचेकडील प्रगत उन्नत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

2. मी प्रगत उन्नत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र तपासणीसाठी ----------------- या कार्यालयामार्फत दिनांक / /20 रोजी संचालक, महिला व बाल कल्याण विभाग, पुणे यांना प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. तथापी संचालक, महिला व बाल कल्याण विभाग, पुणे यांचेकडून सदर प्रमाणपत्र अद्यापपावेतो प्राप्त झालेले नाही.

3. त्याअनुषंगाने विनंती करते की, महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक 82/2001/मसेआ-2000/प्र.क्र. 415 दिनांक 25.5.2001 मधील तरतुदींनुसार मला पोलीस उपनिरीक्षक पदासाठी तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक देवून प्रशिक्षणास हजर करुन घ्यावे. मी नियुक्तीपासून **एक महिन्याचे आत** संचालक, महिला व बाल कल्याण, पुणे यांचेकडील प्रगत उन्नत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करेन. मी मुदतीत सदर प्रमाणपत्र सादर करण्यास चुकल्यास माझी नियुक्ती कोणतेही कारण न देता समाप्त केली जाईल, ही अट मला मान्य आहे.

समक्ष

आपली विश्वासू,

सहा.संचालक
महाराष्ट्र पोलीस अकॅडमी,नाशिक

# Undertaking IX

दिनांक / /2025

प्रति

मा. संचालक,
महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक.

**विषय - जात वैधता प्रमाणपत्र 06 महिन्याचे आंत सादर करणेबाबत.**

अर्जदार - ----------------------------------------------------------

..00..

महोदय,

माझी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या पोलीस उपनिरीक्षक (मुख्य) परीक्षा 2022 मधून पोलीस उपनिरीक्षक पदासाठी निवड झाली आहे. माझा जात प्रवर्ग (येथे जात व प्रवर्ग नमुद करावा) असा असून माझी पोलीस उपनिरीक्षक पदावरील निवड (येथे निवड प्रवर्ग नमुद करावा) झाली असल्याने मला जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

2. महोदय मी दिनांक / / रोजी माझा जात वैधता प्रस्ताव ----------------- (येथे जात पडताळणी समितीचा उल्लेख करावा) येथे सादर केला आहे. त्याबाबतच्या पोचपावतीची छायांकित प्रत सोबत सादर केली आहे.

3. तरी मला जात वैधता प्रमाणपत्र 06 महिन्याच्या सादर करण्याच्या अटीवर प्रशिक्षणास हजर करुन घ्यावे, ही विनंती.

4. मी मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास माझी नियुक्ती रद्द करण्यात येईल याची मला जाणीव आहे.

आपला/आपली विश्वासू

( )

समक्ष

( )

सहाय्यक संचालक
महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक

**Undertaking X**

**(परिशिष्ट पाच)**

**महाराष्ट्र नागरी सेवा(लहान कुंटूबाचे प्रतिज्ञापत्र) नियम,२००५ नुसार अर्जासोबत जोडावयाच्या**

**लहान कुंटुबाच्या प्रतिज्ञापत्राचे नमुना**

**प्रतिज्ञापत्र**

**नमुद-"अ"**

**(नियम ४)**

**दि. / /२०२५**

मी श्री/श्रीमती/कुमारी ---------------------------------------------------------------

श्री------------------------------------------------------ यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी वय----------वर्ष, राहणार------------------------------------------------------------------------------------------------------------याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

१. मी पोलीस उप निरीक्षक या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.
२. आज रोजी मला-----------------(संख्या) इतकी हयात मुले आहेत.त्यापैकी दिनांक-------------नंतर जन्माल आलेल्या मुलांची संख्या---------- इतकी आहे.(असल्यास,जन्मदिनांक नमुद करावा.)
३. हयात असलेल्या मुलांची संख्या------------दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक- --------------नंतर जन्माला आलेल्या,मुलामध्ये या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईन याची मला जाणीव आहे.

दिनांक :-

आपला/आपली विश्वासू,

समक्ष

( ) ( )

सहाय्यक संचालक
महाराष्ट्र पोलीस अकॅडमी,नाशिक